ePaper

**फेब्रुवारीपासूनच उन्हाच्या झळा, राज्यातील थंडी संपली? हवामान विभाग**



| वर्ष - 8 | अंक - 201 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | शनिवार, दिनांक 1 फेब्रुवारी 2025 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews





## निर्मला सीतारमण सादर करणार देशाचा अर्थसंकल्प

# आज देशाचा अर्थसंकल्प!

## अर्थसंकल्पात सात मोठ्या घोषणा होण्याची शक्यता

**। नवी दिल्ली । महाईन्यूज**

**१ फेब्रुवारी २०२५ हा दिवस उजाडला आहे. आज देशाच्या दृष्टीने महत्वाचा दिवस आहे यात काहीही शंका नाही. कारण आज केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण या देशाचा अर्थसंकल्प सादर करणार आहेत. महागाई कमी करण्यासाठी आणि टॅक्समध्ये सवलत देण्यासाठी सरकारकडून मोठ्या घोषणा केल्या जातील अशी शक्यता आहे. दरम्यान या अर्थसंकल्पात सात मोठ्या घोषणा होऊ शकतात अशी चिन्हं आहेत.**



### घरं स्वस्त केली जाण्यासाठी विशेष तरतूद?

घरं स्वस्त केली जाण्यासाठी अर्थसंकल्पात विशेष तरतूद केली जाईल अशी शक्यता आहे. मेट्रो शहरांमध्ये परवडणारी घरं ४५ लाखांहून वाढवत ७० लाखांपर्यंत केली जाईल तर इतर शहरांमध्ये ही सीमा ५० लाखांपर्यंत केली जाईल. गृह कर्जावर मिळणाऱ्या व्याज सवलतीची रक्कम दोन लाख रुपये आहे जी पाच लाख रुपये केली जाईल अशीही शक्यता आहे. असं घडल्यास घर खरेदी करणाऱ्या अनेकांचं स्वप्न पूर्ण होऊ शकणार आहे.

नव्या करधोरणानुसार केंद्र सरकार १० लाख रुपये वार्षिक उत्पन्न करमुक्त करण्याची शक्यता आहे. असं झाल्यास कोट्यवधी नोकरदारांसाठी हा मोठा दिलासा असेल. तसंच १५ ते २० लाख रुपये वार्षिक उत्पन्न असलेल्या करदात्यांना सध्या ३० टक्के कर द्यावा लागतो, हा कर २५ टक्के केला जाईल अशीही चिन्हं आहेत. असं झालं तर करदात्यांसाठी हा खरोखरच मोठा दिलासा असेल यात शंका नाही.

### पेट्रोल आणि डिझेल स्वस्त होणार?

महागाईचा बोजा कमी करण्यासाठी CII ची शिफारस मान्य करुन सरकार एक्ससाईज ड्युटी कमी करण्याचा निर्णय घेऊ शकतं. असं झालं तर पेट्रोल आणि डिझेल यांचे दर कमी होतील. सध्याच्या घडीला पेट्रोलवर १९ रुपये ९० पैसे तर डिझेलवर १५ रुपये ८० पैसे एक्साइज ड्युटी घेतली जाते. या दरांमध्ये कपात झाल्यास पेट्रोल आणि डिझेल स्वस्त होण्याची शक्यता आहे.

### PM किसान सन्मान निधीमध्ये वाढ केली जाणार?

पीएम किसान निधीची रक्कम सरकार वाढवू शकतं अशीही शक्यता आहे. सध्याच्या घडीला किसान सन्मान निधीच्या अंतर्गत शेतकऱ्यांना वार्षिक सहा हजार रुपये दिले जातात. ही रक्कम वार्षिक १२ हजार रुपये केली जाईल अशी शक्यता आहे.

### रोजगाराच्या संधी वाढवणार?

अर्थसंकल्पात रोजगाराशी संबंधित तरतुदी वाढवल्या जातील अशीही चिन्हं आहेत. एकीकृत राष्ट्रीय रोजगार धोरण सरकारतर्फे आणलं जाण्याची शक्यता आहे. ज्या अंतर्गत रोजगार देणाऱ्या सगळ्या खात्यांना एकच प्लॅटफॉर्म मिळेल.

### आरोग्य सेवांवरचा खर्च वाढवला जाण्याची शक्यता

आरोग्य विभागाचं बजेट यावर्षीही वाढवलं जाईल अशी शक्यता आहे. मागच्या आर्थिक वर्षात देशातील आरोग्य सेवेसाठी ९१ हजार रुपये कोटींची तरतूद करण्यात आली होती. या वर्षी यामध्ये किमान १० टक्के वाढ केली जाण्याची शक्यता आहे.

### मोबाइल स्वस्त होणार?

मोबाइल स्वस्त करण्यासाठी सरकार विशेष प्रयत्न करु शकते अशी शक्यता आहे. कंझ्युमर इलेक्ट्रॉनिक्सशी संबंधित पार्टवरची इम्पोर्ट ड्युटी कमी करण्याचा निर्णय घेतला गेला तर मोबाइल स्वस्त होऊ शकतात. रोजगार निर्मितीसाठी स्टार्ट अप्सना सहकार्य याबद्दलही मोठ्या घोषणा होऊ शकतात.

## शहरामध्ये निर्जंतुकीकरण करुनच पाणीपुरवठा

## नागरिकांनी खोट्या 'एसएमएस' वर विश्वास ठेऊ नये : महापालिका

**। पिंपरी । महाईन्यूज**

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या जलशुध्दीकरण केंद्राकडून पाणी निर्जंतुकीकरण करुन विविध शास्त्रोक्त प्रक्रियांचे अवलंब करुनच शहरामध्ये पाणीपुरवठा केला जातो. महानगरपालिकेच्या जलशुध्दीकरण केंद्राकडून पाणी निर्जंतुकीकरणासाठी आवश्यक असणारी टी.सी. एल पावडर वापरण्यात येते.**



नागरिकांना शुध्द पाणी मिळण्यासाठी जलशुध्दीकरण केंद्राकडून अत्यावश्यक प्रक्रियांचा अवलंब करण्यात येत असून शहरामध्ये जलशुध्दीकरण केंद्रातील फिल्टर मशीन बंद असल्याचा व त्यामध्ये बिघाड झाल्याचे 'एसएमएस' सध्या नागरिकांपर्यंत पोहोचत असून पाणी निर्जंतुकीकरण न करताच सोडण्यात येणार असल्याचेही त्याद्वारे सांगण्यात येत आहे. असे एसएमएस खोटे व जाणीवपूर्वक पसरविण्यात येत असून अशी कोणतीही परिस्थिती नाही. जलशुध्दीकरण केंद्रातील

> "सध्या शहरामध्ये फिल्टर मशीन बंद असल्याचे व निर्जंतुकीकरण न करता पाणी सोडण्यात येणार असल्याचे 'एसएमएस' पाठविले जात असून यामध्ये कोणत्याही प्रकारे सत्यता नाही. जलशुध्दीकरण केंद्राकडून पाणी निर्जंतुकीकरणासाठी आवश्यक असणारी टी.सी.एल पावडर वापरण्यात येत आहे. नागरिकांना शुध्द पाणी मिळण्यासाठी जलशुध्दीकरण केंद्राकडून अत्यावश्यक प्रक्रियांचा अवलंब करुनच पाणी सोडण्यात येत आहे. त्यामुळे नागरिकांनी खोट्या माहितीवर विश्वास न ठेवता आपणास येणारे पाणी अशुध्द असल्याचा संभ्रम दूर करावा. सध्या पाठविल्या जाणाऱ्या खोट्या 'एसएमएस' पाठविणाऱ्याचा शोध घेवून संबंधितांवर सायबर गुन्हा दाखल करुन कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे."
>
> **-प्रमोद ओंभासे,** मुख्य अभियंता (१), पाणीपुरवठा विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.

# विचार सोडले, त्यांना जनतेने थारा दिला नाही

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची उद्धव ठाकरेंवर टीका

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**‘बाळासाहेबांचे, आनंद दिघे यांचे विचार सोडणाऱ्यांना जनतेने विधानसभा निवडणुकीत थारा दिला नाही,’ अशा शब्दांत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शुक्रवारी उद्धव ठाकरे यांच्यावर नाव न घेता टीका केली. महायुती सरकारकडून कोणत्याही योजना बंद होणार नाहीत. मात्र, लाडकी बहीण योजनेत खोडा घालणाऱ्यांना जनतेने चारी मुंड्या चीत केले, असेही त्यांनी सांगितले.**



पुरंदर -हवेलीचे आमदार विजय शिवतारे यांनी आयोजित केलेल्या आभार यात्रासभेत ते बोलत होते. उद्योगमंत्री उदय सामंत, रोजगार आणि फलोत्पादनमंत्री भरत गोगावले, आमदार विजय शिवतारे, ममता शिवतारे, रमेश कोंडे, दिलीप यादव, अतुल मस्के या वेळी उपस्थित होते. यावेळी काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष मयूर मुळीक आणि उरुळी देवाची गावचे माजी सरपंच तात्यासाहेब भाडळे (राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार) यांनी शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश केला.‘महायुती सरकारने सुरू केलेल्या कोणत्याही योजना बंद होणार नाहीत. लोकसभा निवडणुकीत आमच्या शिवसेनेला दोन लाख मते ठाकरेंपेक्षा जास्त मिळाली. विधानसभेत १५ लाख ज्यास्त मते मिळाली. आमच्या ८० पैकी पैकी ६० जागा निवडून आल्या. त्यामुळे खरी शिवसेना कोणाची’ अशी विचारणा त्यांनी केली. ‘बाळासाहेब ठाकरे आणि आनंद दिघे यांचे विचार पुढे नेणारे खरे कोण आहे, हे सर्वांना माहिती आहे. ज्यांनी त्यांचे विचार सोडले, त्यांना जनतेने थारा दिला नाही,’ असे शिंदे यांनी सांगितले.‘गेल्या अडीच वर्षात महायुतीला शिव्या देण्यात आल्या. मात्र, आम्ही आरोपांना कामातून उत्तर दिले. त्यामुळे महायुतीचा विजय झाला. लोकसभेनंतर विधानसभेत सरकार येणार हे समजून विरोधकांनी मंत्रिपदे अगोदरच वाटून घेतली होती. पण, चार-पाच महिन्यांतच जनतेने त्यांना जागा दाखविली. घरात बसून राज्य करता येत नाही,’ असे शिंदे म्हणाले. ‘दीड वर्षात कोणत्याही परिस्थितीत गुंजवणीचे पाणी पुरंदरमध्ये येईल. या योजनेपैकी सहा किलोमीटर लांबीचे काम झाले आहे. पुरंदर विमानतळही विकासात महत्त्वपूर्ण ठरणार आहे. पुढील पाच वर्षांत सर्व कामे पूर्ण केली जातील.

### महायुतीला शिव्या देण्यात आल्या

उद्योगमंत्री उदय सामंत, रोजगार आणि फलोत्पादनमंत्री भरत गोगावले, आमदार विजय शिवतारे, ममता शिवतारे, रमेश कोंडे, दिलीप यादव, अतुल मस्के या वेळी उपस्थित होते. यावेळी काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष मयूर मुळीक आणि उरुळी देवाची गावचे माजी सरपंच तात्यासाहेब भाडळे (राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार) यांनी शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश केला.‘महायुती सरकारने सुरू केलेल्या कोणत्याही योजना बंद होणार नाहीत. लोकसभा निवडणुकीत आमच्या शिवसेनेला दोन लाख मते ठाकरेंपेक्षा जास्त मिळाली. विधानसभेत १५ लाख ज्यास्त मते मिळाली. आमच्या ८० पैकी पैकी ६० जागा निवडून आल्या. त्यामुळे खरी शिवसेना कोणाची’ अशी विचारणा त्यांनी केली. ‘बाळासाहेब ठाकरे आणि आनंद दिघे यांचे विचार पुढे नेणारे खरे कोण आहे, हे सर्वांना माहिती आहे. ज्यांनी त्यांचे विचार सोडले, त्यांना जनतेने थारा दिला नाही,’ असे शिंदे यांनी सांगितले.‘गेल्या अडीच वर्षात महायुतीला शिव्या देण्यात आल्या.

# पाण्याच्या शुद्धतेबाबत नागरिकांनी दक्ष राहावे

## जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीनंतर डॉ. गोऱ्हे यांची प्रतिक्रिया

। पुणे ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**पुणे जिल्हा नियोजन समितीची बैठक उपमुख्यमंत्री आणि पालकमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली आज पार पडली. या बैठकीनंतर माध्यमांशी संवाद साधताना विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी विविध महत्त्वाच्या मुद्द्यांवर भाष्य केले.**



याप्रसंगी बोलताना डॉ. नीलम गोऱ्हे म्हणाल्या, “जनतेने दिलेल्या स्पष्ट जनादेशामुळे आम्ही या बैठकीची वाट पाहत होतो. बैठकीत प्रलंबित प्रश्न, आदिवासी आणि सामाजिक न्यायविषयक उपाययोजना, तसेच राज्य आणि जिल्ह्याशी संबंधित काही महत्त्वाच्या विषयांवर चर्चा झाली.”गॅस्ट्रोएन्टेरायटिस (GBS) आणि पाण्याच्या शुद्धतेच्या मुद्द्यावर नागरिकांनी जागरूक राहण्याचे, यावेळी डॉ. नीलम गोऱ्हे यांनी आवाहन केले. “पाणी उकळून पिणे, ते व्यवस्थित थंड करूनच वापरणे गरजेचे आहे. पिण्याच्या पाण्याचे नळ आणि गटार वाहिन्या एकत्र आल्याने पाणी अशुद्ध होण्याचा धोका असतो. त्यामुळे नागरिकांनी त्यांच्या भागात अशा घटना घडत आहेत का, यावर लक्ष ठेवावे,” असे त्यांनी सांगितले.डॉ. गोऱ्हे यांनी शिक्षणाच्या गुणवत्तेबाबत चिंता व्यक्त केली.“मुलांच्या शैक्षणिक प्रगतीबाबत ‘असर’ संस्थेच्या अहवालात अनेक उणिवा दाखवल्या आहेत.

आम्ही हा मुद्दा बैठकीत उपस्थित केला आणि इतर सदस्यांनीही त्यावर चर्चा केली. पुणे जिल्हा परिषदेच्या आणि महानगरपालिकेच्या शाळांमध्ये शिक्षणाच्या गुणवत्तेत सुधारणा करण्यासाठी स्वतंत्र बैठक घेण्याची मागणी आम्ही केली. त्याला पालकमंत्र्यांचा सकारात्मक प्रतिसाद मिळाला आहे,” असे त्यांनी स्पष्ट केले. डॉ. नीलम गोऱ्हे यांनी पुणे मेट्रो प्रकल्प आणि आदिवासी कल्याण योजनांवर लवकरच स्वतंत्र बैठक होणार असल्याचे जाहीर केले. तसेच, बैठकीत सदस्यांनी महानगरपालिका रुग्णालयांमध्ये बाहेरून औषधं लिहून देण्याच्या समस्येवर आवाज उठवला. “कमला नेहरू हॉस्पिटलसारख्या ठिकाणी ही समस्या जाणवते. हा मुद्दा सर्व सदस्यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे पोहोचवला आहे,” असे त्यांनी सांगितले.“पुणे जिल्ह्यातील विकास आराखड्याला पालकमंत्र्यांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाला आहे. शिक्षण, आरोग्य, आदिवासी विकास, आणि सामाजिक न्याय योजनांसाठी ठोस उपाययोजना हाती घेतल्या जातील हे स्वागतार्ह आहे ,असेही डॉ. गोऱ्हे यांनी शेवटी बोलताना नमूद केले.

### पिण्याच्या पाण्याच्या शुद्धतेवर भर

“जनतेने दिलेल्या स्पष्ट जनादेशामुळे आम्ही या बैठकीची वाट पाहत होतो. बैठकीत प्रलंबित प्रश्न, आदिवासी आणि सामाजिक न्यायविषयक उपाययोजना, तसेच राज्य आणि जिल्ह्याशी संबंधित काही महत्त्वाच्या विषयांवर चर्चा झाली.”गॅस्ट्रोएन्टेरायटिस (GBS) आणि पाण्याच्या शुद्धतेच्या मुद्द्यावर नागरिकांनी जागरूक राहण्याचे, यावेळी डॉ. नीलम गोऱ्हे यांनी आवाहन केले. “पाणी उकळून पिणे, ते व्यवस्थित थंड करूनच वापरणे गरजेचे आहे. पिण्याच्या पाण्याचे नळ आणि गटार वाहिन्या एकत्र आल्याने पाणी अशुद्ध होण्याचा धोका असतो. त्यामुळे नागरिकांनी त्यांच्या भागात अशा घटना घडत आहेत का, यावर लक्ष ठेवावे,” असे त्यांनी सांगितले.डॉ. गोऱ्हे यांनी शिक्षणाच्या गुणवत्तेबाबत चिंता व्यक्त केली.“मुलांच्या शैक्षणिक प्रगतीबाबत ‘असर’ संस्थेच्या अहवालात अनेक उणिवा दाखवल्या आहेत. आम्ही हा मुद्दा बैठकीत उपस्थित केला आणि इतर सदस्यांनीही त्यावर चर्चा केली.

# PCMCमध्ये जीबीएसचा पहिला बळी!

## ताप, सर्दीमुळे रुग्णालयात दाखल झाला होता रुग्ण

**| पिंपरी- चिंचवड |**
**प्रतिनिधी : महाईन्यूज |**

**पिंपरी-चिंचवडमध्ये जीबीएसने पहिला रुग्ण दगावला असल्याची माहिती समोर आली आहे. 36 वर्षीय हा तरुण पिंपळे गुरवचा रहिवासी होता. 21 जानेवारीला तो महानगरपालिकेच्या वायसीएम रुग्णालयात दाखल झाला. मात्र ,उपचारासाठी आला तेव्हापासून तो व्हेंटिलेटरवर होता. गेली आठ दिवस त्याला वाचवण्यासाठी डॉक्टरांनी प्रयत्न केले, मात्र, बुधवारी त्याने अखेरचा श्वास घेतला.**



पिंपरीचिंचवडमहानगरपालिकेच्या वैद्यकीय विभागाचे प्रमुख डॉ. लक्ष्मण गोफणे म्हणाले, वायसीएम रुग्णालयाच्या ऑडिट रिपोर्टमध्ये रुग्णाचा जीबीएस मुळे हा मृत्यू झाल्याचे समोर आले आहे.. पिंपळे गुरव भागातील हा तरुण ओला-उबेरचा चालक असून तो 21 जानेवारीला वायसीएम रुग्णालयात दाखल झाला.

तो गाडी चालक असल्यामुळे त्याने कदाचित बाहेरील अन्न आणि दूषित पाणी पिले असल्याची संभावना आहे त्यातूनच त्याला जीबीएस ची लागण झाल्याचे दिसत आहे या व्यतिरिक्त त्याला निमोनिया देखील झाल्याचे आढळून आले होते.

हा ओला उबेर चालक उपचारांसाठी दाखल झाला तेव्हापासून त्याची तब्येत खालावलेली होती, त्यामुळे पहिल्याच दिवशी त्याला व्हेंटिलेटरवर घ्यावे लागले. महापालिकेच्या वायसीएम रुग्णालयामध्ये 21 जानेवारीला हा रूग्ण दाखल झाला होता. ताप, सर्दी आणि अशक्तपणा आल्याने उपचारांसाठी दाखल झाला. तो दाखल झाल्यानंतर चार ते पाच तासांमध्ये त्याला त्रास होऊ लागल्याने त्याला व्हेंटिलेटरवर ठेवण्यात आले. एक्सरे तपासणीनंतर रुग्णाला निमोनिया झाल्याचेही निदान झाले.

> “ संबंधित रुग्ण पिंपळे गुरव भागातील आहे. मात्र, तो ओला-उबेरचा चालक असल्याने तो सकाळी घराबाहेर पडायचा. तो सर्वत्र फिरायचा त्यामुळे कोणत्या पाण्याने त्याला त्रास झाला याबाबतची माहिती नाही. तो ज्या ठिकाणी राहतो, त्या ठिकाणचे पाण्याचे नमुने तपासले मात्र, ते पाणी शुध्द असल्याचे दिसून आले होते. त्यामुळे कामानिमित्ताने फिरत असताना कोणत्या ठिकाणचे पाणी तिला किंवा काही खाल्ले असेल तर त्याबाबतची माहिती महापालिकेला मिळू शकलेली नाही. त्याचा भाऊ देखील ओला-उबेरचा चालक म्हणून काम करतो.
> **- लक्ष्मण गोफने,** वैद्यकीय विभाग प्रमुख, पिंपरी-चिंचवड महापालिका.

# इंद्रायणी थडीसाठी स्टॉल बुकिंगला प्रचंड प्रतिसाद!

## 2 हजार स्टॉलसाठी महाराष्ट्रभरातील बचतगटांची रस्सीखेच


**| जुनी सांगवी |**
**प्रतिनिधी : महाईन्यूज**

**महाराष्ट्रातील सर्वात मोठा इंद्रायणी थडी महोत्सवात स्टॉल मिळवण्यासाठी बचतगटांची अक्षरश: झुंबड उडाली आहे. यंदा 2 हजार स्टॉल उभारण्यात येणार असून, त्यासाठी ऑनलाईन व ऑफलाईन अर्ज स्वीकारण्यात येत आहेत. आतापर्यंत 3 हजार 700 हजाराहून अधिक अर्ज दाखल झाले आहेत. त्यामुळे ‘लकी ड्रॉ’ द्वारे स्टॉल वाटप करण्यात येईल, अशी माहिती नियोजन समितीच्या समन्वयक मुक्ता गोसावी यांनी दिली.**

भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांच्या संकल्पनेतून आणि शिवांजली सखी मंच्या अध्यक्षा पुजा लांडगे यांच्या पुढाकाराने प्रतिवर्षी महिला सक्षमीकरण आणि उद्योजकता प्रोत्साहन या हेतूने इंद्रायणी थडी महोत्सवाचे आयोजन केले जाते.यावर्षी मोशी येथील धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज अंतरराष्ट्रीय प्रदर्शन केंद्राच्या मैदानावर दि. 27 व 28 फेब्रुवारी 2025 आणि दि. 1 व 2 मार्च 2025 असे चार दिवस इंद्रायणी थडी महोत्सव भरवण्यात येणार आहे. “सन्मान स्त्री शक्तीचा.. अभिमान भारतीय संस्कृतीचा..” असे घोषवाक्य आहे. या महोत्सवामध्ये स्टॉलसाठी 9379909090 या क्रमांकावर संपर्क साधावा. तसेच, स्टॉल वाटप पूर्णत: मोफत (नि:शुल्क) आहे. ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी या लिंकवर फॉर्म भरावा. येत्या दि. 5 फेबुवारीपर्यंत अर्ज भरण्याची मुदत आहे. दि.8 फेब्रुवारीपर्यंत स्टॉल वाटप लॉटरी प्रक्रिया पूर्ण होईल, अशी माहिती नियोजन समितीने दिली आहे.इंद्रायणी थडी महोत्सवामध्ये शाकाहारी-मासांहारी खाद्यपदार्थांचे स्टॉल, घरगुती जीवनाश्यक वस्तू, खेळणी, कपडे, ज्वेलरी, कटलरी, सौंदर्य प्रसाधने, सुका मेवा, खाद्य उत्पादने, कृषी उत्पादने, आरोग्य आणि व्यायाम संबंधित उत्पादने यासह डान्स, फॅशन शो, शस्त्र प्रदर्शन, पुस्तक प्रदर्शन, गायन, फोटोग्राफी, रांगोळी, मेहंदी, मंगळागौरी सांस्कृतिक कार्यक्रम असे भरगच्च कार्यक्रम होणार आहेत. त्यामुळे पुणे, पिंपरी-चिंचवडसह महाराष्ट्रभरातील नागरिकांनी या महोत्साचा आनंद लुटावा, असे आवाहन करण्यात आले आहे.महाराष्ट्रातील सर्वात मोठा इंद्रायणी थडी महोत्सवात स्टॉल मिळवण्यासाठी बचतगटांची अक्षरश: झुंबड उडाली आहे. यंदा 2 हजार स्टॉल उभारण्यात येणार असून, त्यासाठी ऑनलाईन व ऑफलाईन अर्ज स्वीकारण्यात येत आहेत. आतापर्यंत 3 हजार 700 हजाराहून अधिक अर्ज दाखल झाले आहेत. त्यामुळे ‘लकी ड्रॉ’ द्वारे स्टॉल वाटप करण्यात येईल, अशी माहिती नियोजन समितीच्या समन्वयक मुक्ता गोसावी यांनी दिली.



## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने



श्रीब्रह्मचैतन्य महाराज गोंदवलेकर

# नाम हाच भगवंताचा अवतार

आजच्या युगात नाम हाच भगवंताचा अवतार आहे. “सुष्टांचे रक्षण आणि दुष्टांचा नाश करण्याकरिता मी अवतार घेतो” असे भगवंतांनी गीतेत सांगितले आहे; त्यावरून असे ठरते की, सुष्ट आणि दुष्ट या दोघांचेही अस्तित्व असून, त्यांत दुष्टांकडून सुष्टांना त्रास होण्यातच भगवंताच्या अवताराची उत्पत्ती आहे. आजकाल पाहू गेले तर असे दिसते की, सुष्टांचे अस्तित्त्वच जवळजवळ दुर्मिळ झाले आहे. म्हणजे, ज्यांचा छळ झाला असता भगवंताने अवतार घ्यावा, ते सुष्टच नामशेष झाले आहेत. मग अवतार तरी कुणासाठी, कसा व्हावा ? याचा अर्थ, अवतार होणारच नाही असे नाही; पण वस्तुस्थिती काय आहे ते यावरून आपल्याला समजेल. आजची परिस्थिती आणि पूर्वीच्या काळजी परिस्थिती यांत फरक आहे. पूर्वी सद्भावना जिवंत होती, पण ती उघडपणे कृतीत आणणे कठीण होते. आता सद्वासनाच नाहीशी झाली आहे, म्हणजे पायाच ढासळला आहे, तिथे कृतीचा प्रश्नच उद्भवत नाही. पूर्वी सद्वासना सूक्ष्मपणे का होईना जिवंत होती, पण स्थूल प्रकट कृती दुर्घट झाली होती; त्या वेळी भगवंताला स्थूलात येऊन कार्य करणेच जरूर होते, आणि अशा वेळी अवतार घेऊन, म्हणजे सगुण रूप धारण करून, भगवंताने कार्य केलेही. आताचा प्रश्न, दुर्वासना जाऊन सद्वासना कशी उत्पन्न होईल हा आहे; म्हणजेच कार्य सूक्ष्मांतले आहे. म्हणजे ‘जसा रोग तसे औषध’ किंवा ‘काट्याने काटा काढावा’ या न्यायाने, उपाययोजना सूक्ष्मातच केली पाहिजे. वासना बदलायला वासनेइतकाच जबरदस्त इलाज पाहिजे; आणि तो म्हणजे भगवंताचे नाम. चालू परिस्थितीशी झगडून मार्ग काढून देणारा असा जर कोणता अवतार असेल तर तो भगवंताच्या नामाचाच आहे, आणि त्याकरिता सर्वांनी भगवंताच्या नामाचा टाहो फोडणेच जरूर आहे. हे कार्य भगवंताने सगुणरूप धारण करून होणे कठीण आहे; ज्याअर्थी कारण सूक्ष्मांतले आहे त्या अर्थी त्याला इलाजही सूक्ष्मांतला पाहिजे. म्हणून नामावताराची आज गरज आहे. प्रत्येक नामागणिक त्याचा अवतार आहे, आणि त्याची कास धरणे, म्हणजेच नाम घेणे, हे आमचे आजचे मुख्य कर्तव्य आहे. तेवढे केले की नाम आपले अवतारकार्य करून दाखवील. आपण आपले प्रेम प्रपंचाकडे लावले आहे, ते नामाकडे लावावे, म्हणजे नामस्मरणात फार आनंद येईल. मनाला नामाची चटक लागली आणि नामाच्या प्रेमातच मन रंगून गेले म्हणजे जन्म सफल झाला.

**बोधवचन:- नामाने कलीची सत्ता नाहीशी होते. म्हणून नामधारकाला कलीची बाधा नाही.**

# मुस्लिमांचे तुष्टीकरणच 'उबाठा' गटाला नडणार!



**'स्टेट'मेंट**

अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक

**वक्फ बोर्डाच्या सुधारणा विधेयकाला विरोध करून उद्धव ठाकरे यांच्या गटाने पायावर कुऱ्हाड मारून घेतली आहे. वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांचे विचार गुंडाळून काँग्रेसबरोबर जाणे एक वेळ मान्य झाले असते, पण आता सरसकट मुस्लिमांची बाजू घेऊन उद्धव ठाकरे यांची पावले पडत असतील, तर ते त्यांच्याच मतदारांना मान्य होणार नाही, हे कोणीही सांगेल. वक्फ बोर्डाचे सुधारणा विधेयक येत असताना उद्धव ठाकरे गटाच्या अरविंद सावंत यांनी त्या विधेयकाला विरोध केला,आणि हे कारण आता उबाठा गटाच्या ऱ्हासाला कारण ठरते की काय, असे वातावरण आहे, हे नक्की !**



### गळती रोखणार कशी ?

कारणे कोणतीही असोत, उबाठा गटाच्या शिल्लक सेनेलाही गळती लागली आहे. त्यांच्या नऊ पैकी सहा खासदारांनी भाजपाचे उंबरठे झिजवणे सुरू केले आहे, तर अनेक आमदार, माजी आमदार एकनाथ शिंदे यांच्या दावणीला केव्हाच जाऊन उभे राहिले आहेत. एखादे पाऊल चुकीचे पडले, तर राजकारणात त्याचे किती खोलवर परिणाम भोगावे लागतात याचे उत्तम उदाहरण म्हणजे उद्धव ठाकरे ! भाजपाशी युती तोडून काँग्रेसबरोबर आघाडी करणाऱ्या उद्धव ठाकरेंना त्यांचेच कार्यकर्ते एवढ्या लवकर धडा शिकवतील, असे वाटले नव्हते. पण, जाणाऱ्यांना जाऊ द्या, ते गद्दार आहेत, पैसे घेऊन फुटतात, अशी उद्धव ठाकरेंची समजूत घालणाऱ्या संजय राऊत आणि सुषमा अंधारे सारख्यांवर विसंबून राहिले, की अवदसा ही मागे लागणारच, याचा छोटासा अंदाजही उद्धव ठाकरेंना लागला नाही..आणि लागला असला तरी त्यांची सुधारण्याची वृत्ती दिसत नाही, असेच दुर्दैवाने म्हणावे लागेल.

### हट्टीपणा, मस्तवालपणा एकमेव कारण...

उद्धव ठाकरेंच्या गटाची ही अवस्था होण्यास खरे म्हणजे एकनाथ शिंदे फुटले त्या दिवशी सुरुवात झाली. पण, हट्टीपणा सोडायचा नाही आणि मस्तवालपणे इतरांवर तोंडसुख घ्यायचे, ही वृत्ती त्यांना रसातळाला घेऊन निघाली आहे. सुरुवातीला काही खासदार गेले, नंतर आमदार गेले.. आता पुन्हा खासदार आणि माजी आमदारांची रांग एकनाथ शिंदे आणि भाजपाच्या दरवाजात उभी आहे, तरीही अजून उद्धव ठाकरे यांच्या प्रवत्यांची तोंडे गप्प होत नाहीत, हा आता शुद्ध मूर्खपणाच म्हणावा लागेल.

राजकारणात सतत सतर्क राहावे लागते आणि त्या अनुषंगाने पावले टाकावी लागतात, हे या शिल्लक गटाला कोणी सांगावे? पण, स्वतःच्या मस्तीत वावरत असताना, वंदनीय बाळासाहेबांच्या कर्तृत्वावर मते मागण्याचे दिवस संपले, हे देखील यांच्या लक्षात येत नाही. काहीही न करता, जनतेपुढे कोणताही दृष्टिकोन न ठेवता केवळ भाजपा आणि एकनाथ शिंदे यांना शिवीगाळ करून, टोमणे मारून मते कशी मिळणार? याचे उत्तर फक्त उद्धव ठाकरेच देऊ शकतात. बरं, यांच्या हेकटपणाला आणि हट्टीपणाला त्यांचा मित्र असणारा शरद पवार यांचा गट, काँग्रेस पक्षही कंटाळला आहे, हे सुद्धा यांच्या लक्षात येत नाही, ही खरी दुर्दैवाची बाब !

### अनेकांचा 'उबाठा' ला जय महाराष्ट्र..

या सर्व पार्श्वभूमीवर आता ठाकरे गटाला खिंडार, अखेर शिंदेंचं ऑपरेशन टायगर यशस्वी.. अशा आशयाच्या बातम्या झळकू लागल्या आहेत. प्रचंड बहुमत घेऊन जिंकलेले 'महायुती' चे सरकार स्थापन झाले असून आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची रणनिती आखली जात आहे. त्या दृष्टीने राजकीय पक्ष कामाला लागल्याचे पाहायला मिळत आहे. एकीकडे मुंबईत ठाकरे गटाने स्वबळाचा नारा दिला, तर दुसरीकडे शिवसेना शिंदे गटही अधिक्र सक्रीय होऊन ठाकरे गटाला धक्का देत आहे. काँग्रेस आणि ठाकरे गटातील पदाधिकारी आपल्या पक्षात घेण्याची स्पर्धाच 'महायुती' मध्ये सुरू झाल्याचे दिसून येत आहे. मंत्री उदय सामंत यांनी काही दिवसांपूर्वी 'ऑपरेशन टायगर' संदर्भात भाष्य करताना काही माजी आमदार व खासदार आमच्या संपर्कात असून लवकरच त्यांचा शिवसेनेत प्रवेश होईल, असे म्हटले होते. त्यानुसार आता पडद्यामागून शिवसेनेचे ऑपरेशन टायगर सुरू असल्याची चर्चा सुरू असून अनेक माजी आमदारांचा लवकरच शिवसेनेत प्रवेश होणार आहे. काँग्रेसचे माजी आमदार रविंद्र धंगेकर हेही धनुष्यबाण हाती घेणार आहेत, असेही धक्कादायक वृत्त आहे.

### उद्धव ठाकरेंचे खासदारही फुटणार

उद्धव ठाकरे यांच्या खासदारांपैकी सहा जण फुटणार असल्याचे बोलले जाते. पक्षांतर विरोधी कायदा लागू पडू नये, म्हणून दोन तृतीयांश म्हणजेच नऊ पैकी सहा खासदार हे भाजपा किंवा एकनाथ शिंदे यांच्या हाताला लागल्याचे सांगण्यात येते.

उदय सामंत यांच्या नेतृत्वाखाली पाच माजी आमदारांचा शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश होणार आहे. काही दिवसांपूर्वी ठाकरेंच्या शिवसेना बैठकीत नाराज होऊन उठून गेलेले चंद्रकांत मोकाटेही ठाकरेंची साथ सोडणार असल्याची माहिती आहे. विशेष म्हणजे काँग्रेसचे माजी आमदार धंगेकर व हुसेन दलवाई यांनी मुक्तागिरी बंगल्यावर जाऊन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेची भेट घेतली आहे.

### गुलाल तिकडे चांगभले..

केंद्रामध्ये नरेंद्र मोदी आणि राज्यात देवेंद्र फडणवीस यांची सरकारे ही चांगल्याच बहुमताने सत्तेवर आलेली असल्यामुळे पुढील पाच वर्षे हलणार नाहीत. मग विरोधी पक्षांमध्ये बसून पाच वर्षे करायचे काय, हा प्रश्न बहुतेकांच्या पुढे पडला असणार, विरोध करावा तर विकासकामे कशी होणार, हा प्रश्न बहुतेकांना भेडसावत असणार आणि त्यातूनच राम राम ठोकण्याचे हे सत्र सुरू झाले असणार ! भारतीय जनता पक्ष हा एकमेव पक्ष असा आहे, ज्याचे लोकप्रतिनिधी पाच वर्षे विरोधी बाकावर सुद्धा बसू शकतात, आणि मतदारांचा कौल मागण्यासाठी नव्याने फिरू शकतात. पण, सत्तेला चटावलेल्यांना , वाटेल ते करून सत्ता हवी असते, थोडा देखील दम ते काढू शकत नाहीत.. हेच तत्व उद्धव ठाकरे यांनी महाराष्ट्राला दाखवून दिले आणि आपल्या कार्यकर्त्यांना उघडून सांगितले. जे त्यांनी पेरले तेच आता उगवते आहे, चला, यालाच म्हणू या गुलाल तिकडे चांगभले !

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# मराठी साहित्यासाठी AI चा वापर करा

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचें मराठी भाषा विभागाला आवाहन

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**आज सगळीकडे एआयचा बोलबाला पाहायला मिळत आहे. या तंत्रज्ञानाचा प्रचार आणि प्रसारासाठी वापर केला पाहिजे. AI युगात जर आपण स्मॉल लँग्वेज मॉडेलमध्ये सर्व साहित्यिकांचे साहित्य टाकले. तर येणाऱ्या पिढीला साहित्यिकांनी काय लिहिले आहे, हे समजेल. त्यासाठी मराठी भाषा विभागाने एआयचा वापर करावा, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.**




पुण्यातील फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मैदानावर आजपासून (दि.३१) तिसरे विश्व मराठी संमेलन सुरू झाले आहे. त्याचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस पुढे म्हणाले की, आयोजकांचे आभार मानतो की तुम्ही संमेलनाला मुंबईतून पुण्यात आणले. माझ्यासारख्या नागपुरी माणसाला पुण्याची मराठी प्रमाण आहे.मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाल्यानंतर हे पहिलेच संमेलन असल्यामुळे पंतप्रधान नरेंद मोदी यांचे आभार मानतो. मधू मंगेशक कर्णिक यांचा सत्कार आपण करतो आहोत, सृजनशील व्यक्तिमहत्व आज नाबाद ९३ आहेत. ते मराठीला समृद्ध करणारे आहेत. मराठीचा विचार करताना स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या विचाराशिवाय ते पूर्ण होत नाही. दिल्लीत साहित्य संमेलनाच्या कार्यालयाचे उद्घाटन आम्ही केले. ही देखील आनंदाची गोष्ट आहे, त्याबद्दल मी स्वतःल भाग्यवान समजतो.काही लोकांनी वाद उपस्थितीत केले, वाद निर्माण झाला नाही, तर ते संमेलन नाही. वाद, प्रतिवाद झालाच पाहिजे . मराठी माणसाला कलह करायला आवडतो.

### तेव्हा मी पुन्हा येईल, मी पुन्हा येईल

एक ही देश नाही जिथे मराठी माणूस पोहोचला नाही. दावोस मध्ये सुद्धा मराठी माणसे स्वागताला होती. मी पुन्हा येईल, हे वाक्य मला पिच्छा सोडत नाही, एखादा शब्द आपल्याला चिपकतो. जेव्हा जेव्हा विश्व मराठी संमेलन होईल. तेव्हा मी पुन्हा येईल, मी पुन्हा येईल, मी पुन्हा येईल. मराठी माणूस जगाच्या पाठीवर कुठे ही असला, तरी तिथे गुणवत्ता आणतो. दुधात साखरेसारखे काम करतो. आनंद आहे की, आपण एकत्रित आहोत. कुठलं शहर किंवा देश सोयीचे असेल, यावर चर्चा करून ५ वर्षात ही संमेलन परदेशात घेऊ, असे सांगून परदेशात मराठी संमेलन घेऊन मराठी भाषेचा डंका सातासमुद्रापार वाजवू, असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

# शास्त्री महाराज आपल्याबद्दल आम्हाला आदर

## नामदेव शास्त्रींनी मुंडेंची पाठराखण केल्यानंतर आव्हाडांची प्रतिक्रिया

। कोल्हापूर ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**बीडमधील मस्साजोग गावचे सरपच संतोष देशमुख यांच्या हत्येचे प्रकरण गेल्या काही दिवासंपासून चांगलेच चर्चेत आहे. या प्रकरणाची चौकशी सुरू असताना राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर देखील आरोप केले जात आहेत. खंडणी प्रकरणातील आरोपी वाल्मिक कराड हा मुंडे यांचा निकटवर्तीय असल्याचा आरोप करत त्यांचा राजीनामा घेतला जावा अशी मागणी विरोधकांकडून करण्यात येत आहे. या आरोपांच्या पार्श्वभूमीवर धनंजय मुंडेंनी भगवान गडावर जाऊन संत भगवान बाबा यांच्या समाधीचे दर्शन घेतले, तसेच गडाचे महंत डॉ. नामदेव महाराज शास्त्री यांच्याशी चर्चा केली. यानंतर भगवान गड मंत्री धनंजय मुंडे यांच्या पाठीशी भक्कमपणे आहे, असे नामदेव शास्त्री यांनी जाहीर केले आहे. दरम्यान त्यांच्या या विधानानंतर राजकीय क्षेत्रातून प्रतिक्रिया उमटताना पाहायला मिळत आहेत.**



राष्ट्रवादी काँग्रेसपक्षाचे नेते आणि आमदार जितेंद्र आव्हाड यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर यासंबंधी पोस्ट केली आहे. यावेळी आव्हाडांनी “डॉ. नामदेव शास्त्री महाराज यांनी आज धनंजय मुंडे आणि वाल्मीक कराड यांचे समर्थन करणे आत्यांत दुर्दैवी आहे”, अशी भावना व्यक्त केली आहे.जितेंद्र आव्हाड यांनी त्यांच्या पोस्टमध्ये विविध आरोप करत काही लोकांची यादी देखील दिली आहे. जितेंद्र आव्हाड म्हणाले की, “डॉ. नामदेव शास्त्री महाराज यांनी आज धनंजय मुंडे आणि वाल्मिक कराड यांचे समर्थन करणे अत्यंत दुर्दैवी आहे. भगवान गडासारख्या पवित्र ठिकाणावरून अशा गुन्हेगारी वृत्तीचे समर्थन आणि पाठराखण होणे,ही समाजासाठी अत्यंत घातक गोष्ट आहे. कधीकाळी आपण भगवानगड राजकारण्यापासून मुक्त करण्याची शपथ घेतली होती? आणि आज निष्पाप लोकांचे बळी घेणाऱ्या लोकांवर खोटे गुन्हे दाखल करून त्याचे आयुष्य उध्वस्त करणाऱ्या धनंजय मुंडे वाल्मिक कराड टोळीचे समर्थन करताय ही मनाला न पटणारी गोष्ट आहे.शास्त्री महाराज आपल्याबद्दल आम्हाला नितांत आदर आहे, पण आपण धनंजय मुंडे वाल्मिक कराड टोळीची पाठराखण करणे हे भगवान बाबांच्या विचारांना तिलांजली देण्यासारखे आहे. धनंजय मुंडे वाल्मिक कराड यांच्या गुन्हेगारी आणि राक्षसी राजकीय महत्वकांक्षेसाठी उध्वस्त केलेल्या समाजातील लोकांची यादी देतोय, त्या सर्वांना आणि धनंजय मुंडे वाल्मीक कराड यांना भगवान गडावर समाजाची परीषद बोलावून समोरासमोर बसून चर्चा घडवून आणा, म्हणजे धनंजय मुंडे वाल्मिक कराड हे किती मोठे संत आहेत हे संपूर्ण जगाला कळेल.अशी खुप मोठी समाजातील लोकांची यादी आहे, (इतर समाजाची यादी जोडल्या ती फार मोठी होईल) ज्यांना घेवून मी आपल्याकडे येतो, यांच्या वेदना आणि त्यांना वेदना देणारा कोण आहे? हे आपण महंत म्हणून विचारणार का? धनंजय मुंडेच्या हाताला लावलेल्या सलाईन पेक्षा धनंजय मुंडे, वाल्मिक कराड यांच्यामुळे अनाथ झालेली लेकरे, विधवा झालेल्या बायका, आपल्या पोटच्या मुलांना गमावून सतत डोळ्यातून आसवे गाळणारे आई-बाप, यांनी घडवून आणलेल्या हल्ल्याने कायम अधु झालेले लोक, अडकवल्यानंतर तुरूंगात खितपत पडलेले किंवा रानोमाळ भटकंती करणारे लोक यांचे दु:ख फार मोठे आहे. सुदर्शन घुले, प्रतीक घुले, गोट्या गित्ते , धनराज फड, सुनिल फड, विष्णु चाटे, रघु फड, यांसारखे समाजातील शेकडो तरुण स्वतः च्या राजकीय फायद्यासाठी गुन्हेगार बनवलेत. त्यांच्या कुटुंबाची काय अवस्था आहे?.”राष्ट्रवादी काँग्रेसपक्षाचे नेते आणि आमदार जितेंद्र आव्हाड यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर यासंबंधी पोस्ट केली आहे. यावेळी आव्हाडांनी “डॉ. नामदेव शास्त्री महाराज यांनी आज धनंजय मुंडे आणि वाल्मीक कराड यांचे समर्थन करणे आत्यांत दुर्दैवी आहे”, अशी भावना व्यक्त केली आहे.

### ही मनाला न पटणारी गोष्ट

जितेंद्र आव्हाड यांनी त्यांच्या पोस्टमध्ये विविध आरोप करत काही लोकांची यादी देखील दिली आहे. जितेंद्र आव्हाड म्हणाले की, “डॉ. नामदेव शास्त्री महाराज यांनी आज धनंजय मुंडे आणि वाल्मिक कराड यांचे समर्थन करणे अत्यंत दुर्दैवी आहे. भगवान गडासारख्या पवित्र अशा गुन्हेगारी वृत्तीचे समर्थन आणि पाठराखण होणे, ही समाजासाठी अत्यंत घातक गोष्ट आहे. कधीकाळी आपण भगवानगड राजकारण्यापासून मुक्त करण्याची शपथ घेतली होती? आणि आज निष्पाप लोकांचे बळी घेणाऱ्या लोकांवर खोटे गुन्हे दाखल करून त्याचे आयुष्य उध्वस्त करणाऱ्या धनंजय मुंडे वाल्मिक कराड टोळीचे समर्थन करताय ही मनाला न पटणारी गोष्ट आहे

# रॅगिंगला कंटाळून विद्यार्थ्याची आत्महत्या

## विद्यार्थ्याला ‘टॉयलेट सीट चाटायला भाग पाडलं

।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**केरळमध्ये शाळेतील रॅगिंग आणि छळाला कंटाळून एका १५ वर्षीय विद्यार्थ्याने १५ जानेवारी रोजी आत्महत्या केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. कोची येथील एका प्रसिद्ध खाजगी शाळेत हा विद्यार्थी शिक्षण घेत होता. शाळेत सतत त्याचा रॅगिंग आणि छळ केला जात असे. अखेर याला कंटाळून शाळेतून परत आल्यानंतर या विद्यार्थ्याने स्वतःचे जीवन संपवले. दरम्यान या विद्यार्थ्याच्या आईने मुलाला शाळेत टॉयलेट चाटण्यास भाग पाडण्यात आल्याचा तसेच टॉयलेट फ्लश होत असताना त्याचे डोके टॉयलेटमध्ये कोंबण्यात आल्याचा दावा केला आहे.**



आत्महत्या केलेल्या मुलाच्या आईने थ्रिपूनीथूरा येथील हिल पॅलेस पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दिली आहे. चाइल्ड कमिशनकडे देखील याचिका दाखल केली असून ज्यामध्ये त्यांनी मुलाच्या छळाची कसून चौकशी केली जावी अशी मागणी करण्यात आली आहे. या तक्रारीत त्या मुलाच्या यापूर्वीच्या शाळेच्या उपमुख्याध्यापकांनी व्यवस्थित वागणूक न दिल्याचा आरोपही त्याच्या आईने केला आहे.आत्महत्या केलेल्या मुलाच्या आईने एका फेसबुक पोस्टच्या माध्यमातून आपले दुःख व्यक्त केले आहे. त्यांनी लिहिले की,“मी माझ्या मुलाच्या न्यायासाठी लढणारी एक दु:खी आई आहे, जो आनंदी, सक्रिय आणि एक प्रेमळ मुलगा होता. त्या दिवशी, माझा मुलगा दुपारी २ वाजून ४५ मिनिटांनी शाळेतून घरी परतला आणि दुपारी ३ वाजून ५० मिनिटांपर्यंत माझे जग उद्ध्वस्त झाले…”. दरम्यान मुलाने इतकं टोकाचं पाऊल का उचललं हे समजून घेण्यासाठी त्याची आई आणि कुटुंबियांनी त्याच्या मित्रांशी चर्चा केली तसेच त्याचे सोशल मीडिया अकाउंट देखील तपासले. यामधून त्याचा शाळेत करण्यात आलेल्या छळाचा प्रकार समोर आला. आत्महत्या केलेल्या मुलाच्या आईने दावा केला की त्यांच्या मुलाला मारहाण करण्यात आली, तसेच त्याच्या त्वचेच्या रंगामुळे त्याचा वारंवार अपमान करण्यात आला, त्याला शिवीगाळ करण्यात आली, इतकेच नाही तर त्याला बळजबरीने वॉशरूममध्ये नेण्यात आले आणि टॉयलेट चाटण्यास भाग पाडण्यात आले, फ्लश होत असताना त्याचे डोके टॉयलेटमध्ये कोंबण्यात आले.मुलाच्या मृत्यूनंतर त्याच्या आईने काही धक्कादायक चॅटचे स्क्रीनशॉट देखील शेअर केले आहेत, ज्यामध्ये काही विद्यार्थी त्या मुलाच्या मृत्यूबद्दल आनंद व्यक्त करताना असल्याचा आरोप करण्यात येत आहे. मुलाच्या मृत्यूनंतर त्याच्या काही मित्रांनी त्याला न्याय मिळावा यासाठी इंस्टाग्रामवर एक पेज सुरू केले, पण शाळेकडून दबाव टाकण्यात आल्यानंतर ते पेज काढून टाकण्यात आले. मुलाच्या आईने दावा केला आहे की शाळा प्रशासनाने सत्य दडपून टाकण्याचा प्रयत्न केला आणि फक्त पोलीस प्रशासनाकडून कारवाई होत असल्याचे त्यांना सांगण्यात आले. “त्याच्या मृत्यूनंतरही त्यांचे क्रौर्य थांबले नाही, मी जेव्हा शाळा प्रशासनाकडे पुरावे घेऊन गेले आणि त्यांना जाब विचारला, तेव्हा त्यांनी मला फक्त माहिती पोलीसांकडे पाठवण्यात आल्याचं ऐकवलं. मला ठाम विश्वास आहे की, शाळेची प्रतिष्ठा वाचवण्यासाठी हे प्रकार दडपण्याचा प्रयत्न केला जात आहे”,मृत्यूनंतरही त्यांचे क्रौर्य थांबले नाही, मी जेव्हा शाळा प्रशासनाकडे पुरावे घेऊन गेले आणि त्यांना जाब विचारला, तेव्हा त्यांनी मला फक्त माहिती पोलीसांकडे पाठवण्यात आल्याचं ऐकवलं. मला ठाम विश्वास आहे की, शाळेची प्रतिष्ठा वाचवण्यासाठी हे प्रकार दडपण्याचा प्रयत्न केला जात आहे.

### व्यवस्थात्मक बदल झाले पाहिजेत

आपल्या पोस्टमध्ये या मुलाच्या आईने न्यायाची मागणी केली आहे. “मी माझ्या मुलासाठी न्यायाची भीक मागते. त्याचा मृत्यू वाया जाता कामा नये. या रानटी कृत्यासाठी जबाबदार असलेल्यांना कठोर शासन व्हावे आणि व्यवस्थात्मक बदल झाले पाहिजेत. माझ्या मुलाप्रमाणे दुसऱ्या मुलाला त्रास होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे.” त्यांनी यावेळी न्यायव्यवस्थेवर पूर्ण विश्वास व्यक्त करत लोकांच्या पाठिंब्याची मागणी केली आहे. त्या म्हणाल्या की, “मी लोकांकडे न्यायासाठीच्या या लढाईला पाठिंबा देण्याचे आवाहन करते. फक्त माझ्या मुलासाठीच नाही, तर शिकण्यासाठी आणि वाढण्यासाठी सुरक्षित वातावरण मिळावे असं स्वप्न पाहणाऱ्या प्रत्येक मुलासाठी.”मुलाच्या मृत्यूनंतर त्याच्या काही मित्रांनी त्याला न्याय मिळावा यासाठी इंस्टाग्रामवर एक पेज सुरू केले, पण शाळेकडून दबाव टाकण्यात आल्यानंतर ते पेज काढून टाकण्यात आले. मुलाच्या आईने दावा केला आहे की शाळा प्रशासनाने सत्य दडपून टाकण्याचा प्रयत्न केला आणि फक्त पोलीस प्रशासनाकडून कारवाई होत असल्याचे त्यांना सांगण्यात आले.

---

# काँग्रेस नेत्यांना हिंदी भाषा समजली नसावी

## सोनिया गांधींच्या टीकेनंतर राष्ट्रपती भवनातून प्रत्युत्तर!

।प्रयागराज।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**“राष्ट्रपती यांची भाषण करता करता चांगलीच दमछाक झाली. त्या कशाबशा बोलत होत्या”, अशी टीका सोनिया गांधी यांनी आजच्या राष्ट्रपतींच्या अभिभाषणावर केली. त्यांच्या या टीकेवर आता प्रत्युत्तर यायला लागले असून राष्ट्रपती कार्यालयातूनही यावर उत्तर देण्यात आलं आहे. सोनिया गांधींचं विधान अस्वीकार्य आहे, असं कार्यालयातून सांगण्यात आलं आहे.**

“संसदेतील माननीय राष्ट्रपतींच्या अभिभाषणावर माध्यमांना प्रतिक्रिया देताना काँग्रेस पक्षाच्या काही प्रमुख नेत्यांनी उच्चपदस्थांच्या प्रतिष्ठेला धक्का पोहोचवणारी टिप्पणी केली आहे आणि म्हणूनच ती अस्वीकार्य आहे. या नेत्यांनी म्हटले आहे की राष्ट्रपती शेवटपर्यंत खूप थकल्या होत्या आणि त्या बोलू शकत नव्हत्या”, असं राष्ट्रपती भवनातील प्रसिद्धी पत्रकात म्हटलं आहे.“राष्ट्रपती भवन स्पष्ट करू इच्छिते की राष्ट्रपती कोणत्याही टप्प्यावर थकल्या नव्हत्या. खरंच, त्यांचा असा विश्वास आहे की उपेक्षित समुदायांसाठी, महिला आणि शेतकऱ्यांसाठी बोलणे थकवणारे असू शकत नाही.



राष्ट्रपती कार्यालयाचा असा विश्वास आहे की कदाचित या नेत्यांनी हिंदीसारख्या भारतीय भाषांमधील वाक्प्रचार आणि भाषण समजले नसेल आणि त्यामुळे त्यांचा गैरसमज निर्माण झाला असेल. कोणत्याही परिस्थितीत अशा टिप्पण्या वाईट, दुर्दैवी आणि पूर्णपणे टाळता येण्यासारख्या आहेत”, असंही राष्ट्रपती भवनातून स्पष्ट करण्यात आलं.सोनिया गांधी म्हणाल्या, ‘राष्ट्रपती यांची भाषण करता करता चांगलीच दमछाक झाली. त्या कशाबशा बोलत होत्या. फारच वाईट’. सोनियांच्या या निरीक्षणाला राहुल गांधी होकार दिला. राष्ट्रपती यांनी भाषणात तेच तेच मुद्दे सांगितले असं राहुल गांधी म्हणाले.“संसदेतील माननीय राष्ट्रपतींच्या अभिभाषणावर माध्यमांना प्रतिक्रिया देताना काँग्रेस पक्षाच्या काही प्रमुख नेत्यांनी उच्चपदस्थांच्या प्रतिष्ठेला धक्का पोहोचवणारी टिप्पणी केली आहे आणि म्हणूनच ती अस्वीकार्य आहे.

### गैरसमज निर्माण झाला असेल

राष्ट्रपती शेवटपर्यंत खूप थकल्या होत्या आणि त्या बोलू शकत नव्हत्या”, असं राष्ट्रपती भवनातील प्रसिद्धी पत्रकात म्हटलं आहे.“राष्ट्रपती भवन स्पष्ट करू इच्छिते की राष्ट्रपती कोणत्याही टप्प्यावर थकल्या नव्हत्या. महिला आणि शेतकऱ्यांसाठी बोलणे थकवणारे असू शकत नाही. राष्ट्रपती कार्यालयाचा असा विश्वास आहे की कदाचित या नेत्यांनी हिंदीसारख्या भारतीय भाषांमधील वाक्प्रचार आणि भाषण समजले नसेल आणि त्यामुळे त्यांचा गैरसमज निर्माण झाला असेल.

# 'या' रस्त्याला दिले दिवंगत अभिनेते रमेश देव यांचे नाव

मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीत अभिनेते, दिग्दर्शक, निर्माते तब्बल सहा दशके चतुरस्र कामगिरी करणारे ज्येष्ठ अभिनेते कै. रमेश देव(RAMESH DEO) यांच्या ९६ व्या जयंती दिनानिमित्ताने अंधेरी पश्चिम, वर्सोवा येथील रस्त्याचे 'अभिनेते श्री. रमेश देव मार्ग' असे नामकरण करण्यात आले.मराठी चित्रपटसृष्टीतील नामवंतांचा गौरव करण्यासाठी 'मराठी चित्रपट कट्टा'चे लोकार्पण आणि रस्त्याचे नामकरण सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी बोलताना सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांनी म्हटले, "मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीत अभिनेते रमेश देव यांची महती खूप आहे, या महान कलाकाराच्या नावाचा मार्ग होणे हे समस्त महाराष्ट्रासाठी आणि कलेवर प्रेम करणाऱ्या सर्वांना आनंद देणारा दिवस आहे. 'मराठी चित्रपट कट्टा'च्या निमित्ताने मराठी चित्रपटसृष्टीतील नामवंतांचा सन्मान करण्याचा आमचा प्रयत्न आहे. त्यासाठी आमदार अमित साटम, नगरसेवक रोहन राठोड या प्रत्येकाने आपल्यापरीने केलेलं काम महत्त्वपूर्ण आहे." मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा यासाठी केलेले प्रयत्न आज यशस्वी झाले त्याचा अभिमान




असल्याचे वक्तव्य केले.याप्रसंगी बोलताना अभिनेते अजिंक्य देव यांनी म्हणाले, "आज संपूर्ण देव कुटुंबियांसाठी हा स्वप्नपूर्तीचा आणि आनंदाचा दिवस आहे. आज बाबांच्या प्रेमापोटी इथे उपस्थित असलेल्या सर्वांचे मी आभार मानतो. बाबांच्या नावाचा मार्ग झाला याचा खूप आनंद झाला आहे. यासाठी मी सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार, भाजप नेते विनोद तावडे, आमदार अमित साटम, नगरसेवक रोहन राठोड यांचे मनःपूर्वक आभार मानतो. या प्रस्तावावर त्यांनी विचार करून पुढाकार घेत यासाठी परवानगी दिली. हे बाबांचे आशीर्वाद आहेत. याचा त्यांनाही निश्चितच आनंद झाला असेल." याप्रसंगी ज्येष्ठ दिग्दर्शक राजदत्त, ज्येष्ठ गायिका वैशाली सामंत, दिव्या खोसला कुमार, कांचन घाणेकर तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर मंडळी उपस्थित होते.

## मीसुद्धा सुशांतसारखं पाऊल उचलणार होतो

चार वर्षं उलटून गेली तरी अजूनही सुशांत सिंह राजपूतच्या मृत्यूबद्दल चर्चा होताना दिसत आहे. त्याचे चाहते अजूनही या धक्क्यातून पूर्णपणे सावरलेले नाहीत. सुशांतच्या मृत्यूमागचं गूढ हे अजूनही कायम आहे. पोलिसांनी जरी त्याची केस बंद केली असली तरी याबद्दल सोशल मीडियावर चर्चा होताना आपल्याला पाहायला मिळते. कोणत्याही गॉडफादरशिवाय केवळ स्वतःच्या मेहनतीवर सुशांतने चित्रपटसृष्टीत स्वतःचं असं वेगळं स्थान निर्माण केलं होतं.सुशांतच्या याच स्ट्रगलबद्दल नुकतंच अभिनेता विवेक ओबेरॉयने भाष्य केलं आहे. इतकंच नव्हे तर सुशांतच्या अंत्यसंस्कारावेळी विवेक स्वतः तिथे उपस्थित होता. त्यावेळी सुशांतच्या वडिलांना पाहून त्याला काय भावना मनात दाटल्या याबद्दल विवेकने खुलासा केला आहे. इतकंच नव्हे तर आपल्या अडचणीच्या काळात आपणही सुशांतसारखं पाऊल उचलणार होतो हेदेखील विवेकने स्पष्ट केलं.

## मेधाने सांगितला प्रवास

विक्रांत मेसी आणि मेधा शंकर अभिनीत '12TH फेल' २०२३ चा सर्वोत्कृष्ट चित्रपट ठरला होता. फक्त २० कोटी बजेट असलेल्या या चित्रपटने बॉक्स ऑफिसवर तब्बल ६६.५८ कोटींची कमाई केली. ६९ व्या फिल्मफेअर पुरस्कार सोहळ्यात '12TH फेल' चित्रपटाला सर्वोत्कृष्ट चित्रपटाचा पुरस्कार मिळाला. हा चित्रपट प्रेक्षकांसह अनेक कलाकारांच्या पसंतीस उतरला आणि त्यांनी भरभरून या चित्रपटाचं कौतुक केलं. या चित्रपटात विक्रांत मेसी याने मनोज शर्मा, तर मेधा शंकरने श्रद्धा जोशी यांची भूमिका साकारली होती.'12TH फेल' चित्रपट २५० भारतीय चित्रपटांच्या यादीत सामील झाला आहे. अशातच चित्रपटात श्रद्धा जोशी यांची भूमिका साकारणाऱ्या मेधा शंकरला आपल्या संघर्षाच्या दिवसांची आठवण आली. तिने सांगितले की एक काळ असा होता जेव्हा तिच्या बँकेच्या खात्यात फक्त २५७ रुपये शिल्लक होते.अलीकडेच आयएमडीबीला (IMDB) दिलेल्या मुलाखतीत मेधा शंकरने तिच्या संघर्षातील दिवसांची आठवण सांगितली. ती म्हणाली, '12TH फेल' चित्रपटाचा भाग होण्यासाठी तिला खूप वेळ लागला. मेधाने २०१८ मध्ये मुंबईत अभिनेत्री म्हणून आपल्या करिअरला सुरुवात केली. २०२२ मध्ये तिने या चित्रपटासाठी कास्टिंग एजन्सीकडे पहिल्यांदा ऑडिशन दिले. नंतर ती दिग्दर्शक विधू विनोद चोप्रा आणि त्यांच्या टीमबरोबर स्क्रीन टेस्टसाठी गेली.ऑडिशनदरम्यान मेधाला हा रोल तिच्यासाठीच आहे अस वाटलं होतं.



## महिलांनी मुलांच्या संगोपनासाठी घरी राहावं

अभिनेत्री काजोल (KAJOL) आणि तिची बहीण तनिषा (TANISHAA) या ज्येष्ठ अभिनेत्री तनुजा (TANUJA) यांच्या मुली आहेत. ज्येष्ठ अभिनेत्री तनुजा यांनी यापूर्वी सांगितले होते की, अभिनय ही त्यांची आवड नव्हती, पण आर्थिक परिस्थितीमुळे त्यांना हा मार्ग स्वीकारावा लागला. कुटुंबाच्या आर्थिक अडचणीमुळे त्यांना खूप मेहनत करावी लागली, कारण त्यांना घर आणि संपूर्ण कुटुंबाची जबाबदारी उचलावी लागली. ही संघर्षमय परिस्थिती पुढेही सुरू राहिली, तनुजा आणि त्यांचे पती शोमू मुखर्जी यांनी विभक्त होण्याचा निर्णय घेतल्यानंतर तनुजांवर त्यांची दोन्ही मुली – काजोल आणि तनिषा यांचे पालनपोषण करण्याची जबाबदारी आली. तनुजा यांच्या मुलींनाही त्यांच्या आईच्या सतत कामानिमित्त घराबाहेर राहण्याची सवय झाली. मात्र, अलीकडील एका मुलाखतीत तनिषाने सांगितले की, माझी इच्छा होती की माझी आई जर काम न करता घरी आमच्याजवळ राहायला हवी होती असे वाटते. तिने हेही म्हटले की, महिलांनी किमान पाच वर्षे आपल्या मुलांवर लक्ष केंद्रित करून नंतरच काम करावे.HAUTTERFLY ला दिलेल्या एका मुलाखतीत तनिषाने सांगितले, "माझी आई आम्ही लहान असताना कामावर जात असे, जर ती कामावर न जाता आमच्याजवळ राहिली असती तर चांगलं झालं असतं. जेव्हा माझा जन्म झाला, तेव्हा आमच्याकडे पुरेसं आर्थिक स्थैर्य नव्हतं, त्यामुळे आईला काम करावं लागलं. ती दिवसाला दोन ते तीन शिफ्टमध्ये काम करत असे. त्यामुळे मला आईला भेटण्याची संधीच मिळत नसे. यामुळे मी तिच्या खोलीत झोपत असे, कारण त्यामुळे मला तिच्या जवळ असल्यासारखं वाटायचं."

## माधुरीचा 'हम आपके है कौन'चा खास लूक

बॉलीवूडमधील धक धक गर्ल माधुरी दीक्षित आजही तिच्या अभिनयासह नृत्य कौशल्यामुळे चर्चेत आहे. १९९४ रोजी प्रदर्शित झालेला 'हम आपके है कौन' या चित्रपटातील माधुरी दीक्षित आणि सलमान खानची जोडी लोकप्रिय ठरली होती. यात अभिनेत्री विविध प्रकारच्या मॉडर्न आणि एथिनिक लूकमध्ये दिसली होती. या चित्रपटातील गाणी आणि कथानकामुळे चित्रपट हिट झाला होता.मोठ्या कुटुंबासह मित्रपरिवारासमवेत होणाऱ्या भव्य लग्नसोहळ्याचा ट्रेंड त्याकाळी चित्रपटामुळे घराघरांत पोहोचला. चित्रपटात हिंदी सिनेसृष्टीतल्या दिग्गज कलाकारांसह मराठमोळे कलाकारही होते. रेणुका शहाणे, अनुपम खेर, रिमा लागू, अलोक नाथ, लक्ष्मीकांत बेर्डे, प्रिया बेर्डे अशी स्टारकास्ट या चित्रपटाला लाभली होती.'हम आपके है कौन' चित्रपटातील 'दीदी तेरा देवर दीवाना' हे गाणं तेव्हा खूप प्रसिद्ध झालं होतं. या गाण्यामधील माधुरी दीक्षितच्या जांभळ्या रंगाच्या साडीने आणि बॅकलेस ब्लाऊजने प्रेक्षकांचं लक्ष वेधलं होतं. प्रसिद्ध डिझायनर अण्णा सिंग यांनी त्यावेळी ही साडी डिझाइन केली होती. चित्रपटाच्या प्रदर्शनाच्या वेळी तब्बल ₹१.५ दशलक्ष किंमतीची ही साडी केवळ फॅशन स्टेटमेंटच नव्हती, तर तिच्या अनोख्या बॅकलेस ब्लाउज आणि फूल स्लीव्हजसह त्याकाळी चर्चेचा विषय ठरली.तीस वर्षांनंतर पुन्हा एकदा माधुरीने 'दीदी तेरा देवर दीवाना' या गाण्यातील जांभळ्या साडीमधला लूक रिक्रिएट केला आहे. या लूकचा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. 'डान्स दिवाने'च्या रिॲलिटी शोसाठी माधुरीने या आउटफिटची निवड केली आहे.



# पुण्यनगरीत टीम इंडियाने कमावलं!

## अष्टपैलू कामगिरी अन् भारताने इंग्लंडविरुद्ध विजय मिळवला

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**संघाची अष्टपैलू कामगिरी, भेदक गोलंदाजी, वादळी फलंदाजी अन् भारताने इंग्लंडविरूद्ध ३-१ च्या फरकाने मालिका विजय मिळवला. इंग्लंडविरूद्ध चौथ्या टी-२० सामन्यात १५ धावांनी आणि ३ चेंडू राखून विजय मिळवला. भारताचे गोलंदाज आणि शिवम दुबे-हार्दिक पंड्याने इंग्लंडकडून हा सामना हिसकावून घेतला. भारताने इंग्लंडला १८२ धावांचे आव्हान दिले होते. पण संघ १६६ धावांवर सर्वबाद झाला.**




इंग्लंडचा संघ या सामन्यात १८२ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी उतरला, तेव्हा बेन डकेट आणि फिल सॉल्ट या सलामीच्या जोडीने त्यांना चांगली सुरुवात करून दिली आणि पहिल्या विकेटसाठी ६२ धावांची भागीदारी केली. यावेळेस सामना भारताच्या हातून निसटतो का अशी भिती निर्माण झाली. पण ही भागीदारी तोडण्याचे काम टीम इंडियाचा युवा फिरकीपटू रवी बिश्नोईने केले. यानंतर भारतीय संघाला सामन्यात पुनरागमन करण्याची संधी मिळाली. जोस बटलर केवळ २ धावा करून पॅव्हेलियनमध्ये परतला, तर लियाम लिव्हिंगस्टन केवळ ९ धावा आणि जेकब बेथेल ६ धावाच करू शकला.हॅरी ब्रूकने या सामन्यात एका टोकाकडून २६ चेंडूत ५१ धावांची खेळी खेळून निश्चितच इंग्लंडला सामन्यात कायम ठेवले, पण या मालिकेत तो पुन्हा एकदा वरुण चक्रवर्तीचा बळी ठरला आणि इथूनच इंग्लंडचा सामना भारताच्या बाजूने वळला. या सामन्यात रवी बिश्नोईने ४ षटकात केवळ २८ धावा देत तीन विकेट्स घेतल्या, तर हर्षित राणाने ४ षटकात ३३ धावा देत तीन महत्त्वपूर्ण विकेट मिळवले. याशिवाय वरुण चक्रवर्तीने २ तर अर्शदीप सिंग आणि अक्षर पटेलने प्रत्येकी १ विकेट घेतली.नाणेफेक गमावल्यानंतर इंग्लंड संघाने भारताला प्रथम फलंदाजासाठी पाचारण केले. भारताच्या सलामीच्या जोडीने पहिल्याच षटकात १२ धावा करत दणक्यात सुरुवात केली. पण दुसऱ्या षटकात भारताला एक नव्हे तीन धक्के बसले. संजू सॅमसन आणि तिलक वर्मा पहिल्या दोन चेंडूवर झेलबाद झाले. तर तिसऱ्या चेंडूवर कर्णधार सूर्यकुमार यादव झेलबाद झाला. साकिब महमूदने एका षटकात ३ विकेट घेत एकही धाव दिली नाही. भारताची स्थिती दुसऱ्या षटकानंतर १२-३ अशी होती. पण यानंतर रिंकू सिंगने ३० धावांची महत्त्वपूर्ण खेळी करत संघाचा डाव सावरला.रिंकू सिंग बाद झाल्यानंतर टीम इंडिया पुन्हा अडचणीत आली. पण भारताचे दोन अष्टपैलू खेळाडू हार्दिक पंड्या आणि शिवम दुबे यांनी ८७ धावांची विक्रमी भागीदारी रचत भारताला १८१ धावांची महत्त्वपूर्ण धावसंख्या उभारण्यात मदत केली. इतकंच नाही तर हार्दिक पंड्या आणि शिवम दुबे यांनी शानदार अर्धशतक झळकावली. इंग्लंडविरुद्धच्या चौथ्या टी-२० मध्ये हार्दिक पांड्याने ३० चेंडूत ४ चौकार आणि ४ षटकारांसह ५३ धावांची खेळी खेळली. तर शिवम दुबेने ७ चौकार आणि २ षटकारांसह ३४ चेंडूत ५३ धावा केल्या.भारत वि इंग्लंड चौथ्या टी-२० सामन्यात भारताच्या दोन अष्टपैलू खेळाडूंनी टीम इंडियाला मोठी धावसंख्या उभारून देण्यात मोठी भूमिका बजावली. भारतीय संघाने प्रथम फलंदाजी करताना ९ बाद १८१ धावा केल्या आहेत. भारतीय संघ ३ बाद १२ धावांवर असतानाही संघाने चांगली धावसंख्या उभारली. हार्दिक पंड्या आणि शिवम दुबे या दोघांनी अर्धशतकं झळकावली आहेत. साकिब महमूदच्या गोलंदाजीवर भारताने दुसऱ्याच षटकात ३ विकेट्स गमावले. भारताचे टॉप-३ फलंदाज एका झटक्यात बाद झाले होते. यानंतर रिंकूने संघाचा डाव उचलून धरला पण तो बाद झाल्यानंतर भारताला चांगली धावसंख्या उभारण्यासाठी चांगल्या भागीदारीची गरज होती. पंड्या आणि दुबेने ८७ धावांची भागीदारी रचत आपापली अर्धशतकं देखील पूर्ण केली.

### पंड्याने अर्धशतकासह घेतला बदला

इंग्लंडविरुद्धच्या चौथ्या टी-२० मध्ये हार्दिक पांड्याने ३० चेंडूत ४ चौकार आणि ४ षटकारांसह ५३ धावांची खेळी खेळली. टीम इंडिया अडचणीत असताना त्याच्या बॅटमधून ही तुफान खेळी पाहायला मिळाली. पंड्याने क्रीजवर येताच तुफानी फटके खेळले आणि अवघ्या २७ चेंडूत अर्धशतक झळकावले. या खेळीसह हार्दिकने राजकोटमधील खेळीनंतर केलेल्याचा बदला घेतला राजकोटमध्ये झालेल्या तिसऱ्या टी-२० मध्ये हार्दिक पंड्याने ४० धावा केल्या, पण त्याने ३५ चेंडू खेळले. त्याचा स्ट्राइक रेट १२० पेक्षा कमी होता. मोठी गोष्ट म्हणजे त्याने शेवटच्या ओव्हर्समध्ये ध्रुव जुरेलला स्ट्राईकही दिला नाही आणि त्यानंतर तो स्वतः बाद झाला. हार्दिकच्या या खेळीनंतर त्याच्यावर जोरदार टीका झाली. यानंतर चौथ्या टी-२० मध्ये इंग्लंडच्या गोलंदाजांची धुलाई केली. हार्दिकने महमूदच्या गोलंदाजीवर दोन दणदणीत षटकार लगावत त्याच्या गोलंदाजीवर तुफान फटकेबाजी केली.

# गंभीरचा निर्णय ठरला सामन्याचा टर्निंग पॉइंट

## गौतम गंभीरच्या मास्टर स्ट्रोकमुळे भारताने मारली बाजी!

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारतीय क्रिकेट संघाने पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेतील चौथ्या सामन्यात इंग्लंडचा १५ धावांनी पराभव केला. या सामन्यात टीम इंडियाने प्रथम फलंदाजी करताना ९ बाद १८१ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात इंग्लंडचा संघ १६६ धावा करून ऑलआऊट झाला.**




या सामन्यात भारतीय संघाची फलंदाजी आणि गोलंदाजी या दोन्हीत निराशाजनक सुरुवात झाली, मात्र डगआऊटमध्ये बसलेल्या मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीरने असा मास्टर स्ट्रोक पाहायला मिळाला की, ज्याने अल्पावधितच संपूर्ण सामन्यालाच कलाटणी दिली आणि भारताने बाजी मारली.वास्तविक, टीम इंडियाकडून फलंदाजी करताना शिवम दुबेच्या डोक्याला दुखापत झाली. शिवम दुबेची दुखापत खूप गंभीर होती, त्यामुळे तो क्षेत्ररक्षणाच्या वेळी मैदानावर येऊ शकला नाही. अशा स्थितीत, कनक्शनच्या नियमांनुसार, टीम इंडिया शिवम दुबेच्या जागी आणखी एखाद्या खेळाडूला मैदानात उतरवू शकते. इथेच गौतम गंभीरने आपला मास्टर स्ट्रोक खेळत हर्षित राणाला मैदानात उतरवले.हर्षित राणाला याआधी टीम इंडियाकडून टी-२० फॉरमॅटमध्ये खेळण्याची संधी मिळाली नव्हती. अशा प्रकारे हा हर्षित राणाचा पदार्पणाचा सामना ठरला. हर्षितने या सामन्यात तीन महत्त्वपूर्ण विकेट्स घेत आपले टी-२० पदार्पण संस्मरणीय केले. हर्षित राणाच्या या दमदार कामगिरीमुळे टीम इंडियाने सामन्यात मजबूत पकड निर्माण केली. यानंतरही गौतम गंभीर सीमारेषेवर उभा राहून आपल्या खेळाडूंना सतत मार्गदर्शन करत होता. तो सीमारेषेवर हार्दिक पंड्याला मार्गदर्शन करतानाचा फोटो सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे.

### शिवम दुबेच्या डोक्याला दुखापत

विशेष म्हणजे भारताने अखेरच्या षटकात इंग्लंडचा १५ धावांनी पराभव केला.या सामन्यात भारतीय संघाची फलंदाजी आणि गोलंदाजी या दोन्हीत निराशाजनक सुरुवात झाली, मात्र डगआऊटमध्ये बसलेल्या मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीरने असा मास्टर स्ट्रोक पाहायला मिळाला की, ज्याने अल्पावधितच संपूर्ण सामन्यालाच कलाटणी दिली आणि भारताने बाजी मारली.वास्तविक, टीम इंडियाकडून फलंदाजी करताना शिवम दुबेच्या डोक्याला दुखापत झाली. शिवम दुबेची दुखापत खूप गंभीर होती, त्यामुळे तो क्षेत्ररक्षणाच्या वेळी मैदानावर येऊ शकला नाही.

# मनशांतीसाठी सूर्य नमस्कार महत्वाचे!

## कविता कडू पाटील : गायत्री इंग्लिश मिडीयम स्कूलमध्ये जागतिक सूर्यनमस्कार महोत्सव साजरा

। पिंपरी-चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**हल्लीच्या धकाधकीच्या जीवनामध्ये मनःशांती हरवली आहे आणि आपल्या मनाच्या स्थिरतेसाठी योगा व सूर्यनमस्कार महत्वाचे आहेत. मुलांनी हे तंत्र अवगत करून घेतले पाहिजे असे आवाहन व्यवस्थापकीय संचालिका कविता कडू पाटील यांनी व्यक्त केले.**




गायत्री इंग्लिश मिडीयम स्कूलमध्ये जागतिक सूर्यनमस्कार महोत्सव मोठया उत्साहात साजरा करण्यात आला. त्यावेळी कविता कडू पाटील बोलत होत्या. संस्थाध्यक्ष विनायक भोंगळे, आशा किरण फौंडेशनचे अध्यक्ष रामकृष्ण पालमकर, कार्याध्यक्ष गणेश विपट, खजिनदार म्हाळसाकांत देशपांडे, योगगुरू निर्मलकुमार गुप्ता आदी उपस्थित होते. पीसीएमसी परिसरामध्ये दरवर्षी जानेवारी महिन्यामध्ये भोसरी विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेश लांडगे हे जागतिक सूर्यनमस्कार महोत्सव आयोजित करतात . यावर्षी आशाकिरण फौंडेशनच्या माध्यमातून या उपक्रमाला राबविण्यात आले. गायत्री इंग्लिश मिडीयम स्कूल मधील विद्यार्थ्यांनी यात सहभाग घेतला. या कार्यक्रमासाठी कामगार नेते सचिन लांडगे यांनी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती नोंदविली. यावेळी सचिव संजय भोंगाळे, विश्वस्त सरिता विखे पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व मुख्याध्यापक-उपमुख्याध्यापक, शिक्षकवृंद व विद्यार्थी उपस्थित होते.

---

## क्रांतिवीर चापेकर स्मारकाच्या उभारणीस वेग येणार

### एकनाथ शिंदे : गायत्री स्कूल मधील कौतुकास्पद उपक्रम

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**पिंपरी चिंचवडमध्ये क्रांतिवीर चापेकर स्मारकासाठी ४१ कोटी निधीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रशासकीय मान्यता दिली आहे. हे स्मारक उभारण्यासाठी १९९७ पासून मागणी होत होती. उपमुख्यमंत्र्यांच्या मान्यतेमुळे आता क्रांतिवीर चापेकर स्मारक उभारणीस वेग येणार आहे.**



चापेकर वाडा येथे स्मारक तयार करण्यासाठी सर्वप्रथम दत्ताजी साळवी, सभापती स्वातंत्र्यसैनिक उच्चाधिकार समिती यांनी तत्कालीन मुख्यमंत्र्यांना विनंती केली होती. त्यानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये सप्टेंबर, १९९७ मध्ये ठराव मंजूर करुन चापेकर स्मारकाचा २९ लक्ष रकमेचा पहिला टप्पा पूर्ण करण्यात आला. त्यानंतर २००२ मध्ये ४४ लक्ष किंमतीचा दुसरा टप्पा पूर्ण करण्यात आला.

मुख्यमंत्री असताना एकनाथ शिंदे यांनी जुलै, २०२३ मध्ये स्थानिक खासदार श्री. बारणे यांच्या विनंतीनुसार यथोचित स्मारक उभारण्यासाठी शासनामार्फत ४१ कोटी देण्याचे निर्देश दिले होते.

तत्कालीन उपमुख्यमंत्री व आताचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीदेखील यासंदर्भात निर्देश दिले होते.

आता उपमुख्यमंत्री शिंदे यांनी चापेकर स्मारकाचे काम पूर्ण होण्यासाठी ६८ कोटी रकमेच्या आराखड्यास मंजुरी देऊन ४१ कोटी इतक्या निधीस प्रशासकीय मान्यता दिली आहे. स्मारकाच्या या कामात स्थापत्य विषयक कामे, संग्रहालय, ऐतिहासिक कास्य शिल्प, ऑडियो व्हीज्युअल अशा कामांचा समावेश आहे.

## चऱ्होली, हिंजवडीतून ९५ ई-बस धावणार

। पिंपरी ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेडकडून (पीएमपीएमएल) चऱ्होली आणि हिंजवडी फेज दोन येथे ई बस डेपो होणार आहे. यामधून ९५ ई बस सोडण्याचे नियोजन प्राथमिक टप्प्यात आहे. या ठिकाणी लवकरच ई-बस डेपो कार्यान्वित होणार आहे. या बस सुरू झाल्यास दोन्ही भागातील नागरिकांची गैरसोय देखील दूर होणार आहे.

चऱ्होली आणि हिंजवडी फेज-२ येथे डेपो झाल्यास ई-डेपोंची संख्या सात होणार आहे. नवीन सुरू करण्यात येणाऱ्या ई-बस डेपोमधून शंभर ई-बस सोडण्यासाठी मार्गाचे व कर्मचाऱ्यांचे नियोजन करण्याचे काम पीएमपीएमएलकडून सुरू करण्यात येत आहे. शहरातील कार्बन उत्सर्जन कमी करण्यासाठी आणि हरित ऊर्जेच्या वापराला प्रोत्साहन देण्यासाठी पीएमपीएमएलकडून ताफ्यात पर्यायी इंधनावरील बस वापराला प्रोत्साहन दिले जात आहे. त्यानुसार ताफ्यात सीएनजी व ई-बस वाढविण्यावर भर दिला जात आहे.



> चऱ्होली आणि हिंजवडी फेज २ या ठिकाणचे ई-डेपो लवकरच सुरू केले जणार आहेत. या डेपोतून अनुक्रमे ३५ आणि ६० ई-बस सोडण्याचे नियोजन आहे. या बस कोणत्या मार्गावर सोडायच्या, याचे नियोजन सुरू करण्यात येत आहे.
>
> **–सतीश गव्हाणे,** मुख्य वाहतूक व्यवस्थापक, पीएमपीएमएल

पीएमपीएमएलच्या ताफ्यात ई-बसची अधिक संख्या दाखल होणार आहे. पुण्यासह पिंपरी-चिंचवड शहरातील नागरिकांना देखील त्याचा फायदा होणार आहे. पीएमपीएमएलच्या ताफ्यात टप्प्याटप्प्याने नवीन ६५० ई-बस दाखल होणार होत्या. मात्र, चऱ्होली आणि हिंजवडी फेज २ ई-बस डेपोंचे काम एक ते दीड वर्षांपासून रखडले होते.


Golden opportunity for Pune & PCMC student's
GURUKUL ONLINE CLASSES
YOUR CHILD'S FUTURE IS OUR PRIORITY
Nursary to 7th
All Subjects, Only Special Subject Available..
Math's, EVS, All language
Admission Open
Batch Starts 7th June 2023
MORE INFO
96577 67000 / 70209 85375
EXPRESS MEDIA ENTERPRISES
आजच प्रवेश निश्चित करा...आणि निश्चिंत रहा..!


DP Enterprises
one call problem solve
PEST CONTROL
ELECTRICIAN
PAINTING
PLUMBING
All Maintenance Services
Pimpri-Chinchwad, Pune.
PRICE
QUALITY
SERVICE
we provide all types of home services.
CONTACT :- 86000 60593 / 99214 66191


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
• Documentary
• Weddings
• Drone
• Motion Graphics
• Testimonials
• Tutorial videos
• Product Videos
• Animation
• Social Media Content
• Promotional Videos
• Real Estate
• Corporate
• Advertising
• Events
PUNE
Contact : 9657767000 / 9370493922